# मंगलाताई भागवत फाऊंडेशन

**वेळ : २ तास** **विषय : भूगोल** **गुण : ४०**

---

**सूचना :**

१. सर्व प्रश्न/कृती सोडवणे आवश्यक आहे.

२. उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवतात.

३. प्रश्न क्र. ४(अ) साठी पुरवण्यात आलेल्या भारत/ब्राझील नकाशा आराखड्याचा वापर करुन तो मुख्य उत्तर पत्रिकेला जोडावा.

४. प्रश्न क्रमांक ६(अ) साठी पुरवण्यात आलेल्या आलेख कागदाचा वापर करुन ती पुरवणी मुख्य उत्तर पत्रिकेस जोडावी.

५. प्रश्नांची उत्तरे लिहिताना आवश्यक तेथे आकृत्या वा आलेख काढावेत.

६. प्रश्नांची उत्तरे लिहिताना नकाशा काढण्यासाठी स्टेनसिलचा आवश्यक तेथे वापर करावा.

७. प्रश्नांची उत्तरे निळ्या/काळ्या शाईच्या पेनाने लिहावीत, पेन्सिलीने लिहिलेली उत्तरे ग्राह्य धरली जाणार नाहीत.

८. आकृत्या, आलेख व नकाशा इत्यादी कार्य करण्यासाठी शिसपेन्सिल/रंगीत पेन्सिल वापरण्यास हरकत नाही.

**प्रश्न १ अचूक सहसंबंध ओळखा व साखळी बनवा.**

(१) भारतातील राज्ये दक्षिणेकडून उत्तरेकडे महाराष्ट्र–कर्नाटक–तमिळनाडू–हरियाणा

(२) भारतातील प्राकृतिक भूरूपे उत्तरेकडून दक्षिणेकडे हिमालय पर्वत–दख्खनचे पठार–उत्तरेकडील मैदान–निलगिरी डोंगर

(३) ब्राझील मधील राज्ये लोकसंख्या घनतेच्या उतरत्या क्रमानुसार :
रिओ–दी–जनेरिओ–रोराईसा–पारईबा–पाराना

(४) ब्राझील मधील प्रदेशातील पावसाचे प्रमाण चढत्या क्रमानुसार
ब्राझीलची जन्मभूमी – पॅराग्वे–पॅराना नद्यांची खोरी – किनारी प्रदेश – ॲमेझॉन नदीचे खोरे.

**प्रश्न २ . योग्य जोड्या जुळवा.**

| **'अ' स्तम्भ** | | | **'ब' स्तम्भ** |
|---|---|---|---|
| i) | विटोरीया | – | १) भारतातील रेलवे स्थानक |
| ii) | थरचे वाळवंट | – | २) ब्राझील मधील विरळ लोकसंख्या असलेले राज्य |
| iii) | नर्मदा खोरे | – | ३) ब्राझील मधील बंदर |
| iv) | इटारसी | – | ४) भारतातील विरळ लोकसंख्या असलेला प्रदेश |
| | | | ५) केंद्रिय वस्ती |
| | | | ६) सुवर्ण चतुर्भुजा मार्ग |

**प्रश्न ३. पुढील बाबींची नावे द्या. (कोणतेही ४)** **(४)**

१) प्राचीन भारतातील नागरी वस्ती असलेली शहरे.

२) भारतामध्ये आढळणाऱ्या वनस्पती.

३) क्षेत्र भेटीसाठी लागणारे उपयुक्त साहित्य.

४) भारतात आढळणारी खनिजे.

५) ब्राझील मधील दाट लोकसंख्या असलेली राज्ये.

**प्रश्न ४.अ) तुम्हांस पुरवलेल्या भारताच्या नकाशा–आराखड्यात पुढील घटक दाखवा, तसेच त्यांची नावे द्या व चिन्हांची सूची तयार करा. (फक्त ४)** **(४)**

१) पोरबंदर २) सातपुडा पर्वतरांगा ३) भारताची राजधानी

४) लोकसंख्येची विरळ घनता असणारे राज्य–आसाम

५) जम्मू आणि काश्मीर

६) नागरी लोकसंख्येची जास्त टक्केवारी असणारे राज्य – गोवा

**आ) पुढील नकाशाचे वाचन करुन त्यासंबंधी दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (फक्त २)** **(४)**



प्रश्न: १) ब्राझीलची राजधानी कोणती ?

२) कोणत्या राज्यातून मकरवृत्त जाते ?

३) कोणत्या राज्यातून विषुववृत्त जाते ?

४) रिओ ग्रांडे दो सुल याच्या पूर्वेस कोणता महासागर आहे ?

५) ॲमेझोनास राज्याच्या पश्चिमेकडील बाजूस असणारा देश कोणता ?

**प्रश्न ५. पुढील विधानांची भौगोलिक कारणे लिहा. (फक्त २) (६)**

१) ब्राझीलमध्ये नियमित हिमवर्षाव होत नाही.

२) भारताकडे एक 'तरुण देश' म्हणून पाहिले जाते.

३) भारत व ब्राझील या दोन्ही देशांत मिश्र अर्थ व्यवस्था आहे.

४) भारतात लोहमार्गांची वाहतूक मोठ्या प्रमाणात केली जाते.

**प्रश्न ६.अ) पुढील सांख्यिकीय माहितीच्या आधारे साधा रेषालेख काढा व पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.(६)**

ब्राझील नागरी लोकसंख्येची टक्केवारी

(१९६० ते २०१०)

| **वर्ष** | **१९६०** | **१९७०** | **१९८०** | **१९९०** | **२०००** | **२०१०** |
|---|---|---|---|---|---|---|
| नागरी लोकसंख्येची टक्केवारी | ४७.१ | ५६.८ | ६६.० | ७४.६ | ८१.५ | ८४.६ |

प्रश्न १) आकडेवारीतील वर्षांतर किती आहे ?

२) वरील रेषालेख काय दर्शवितो ?

३) कोणत्या काळात नागरीकरण कमी गतीने झालेले आढळते ?

**किंवा**

**प्रश्न ६.आ) पुढील आलेखाचे वाचन करुन त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (६)**




प्रश्न:
1. १) १९९५ साली कोणत्या देशांत अधिक परदेशी पर्यटक आले ?
2. २) २००० साली कोणत्या देशात अधिक परदेशी पर्यटक आले ?
3. ३) कोणत्या वर्षापासून भारतातील परदेशी पर्यटकांची संख्या वाढलेली दिसते ?
4. ४) २०१५ साली दोन्ही देशांतील परदेशी पर्यटकांची संख्या किती होती ?
5. ५) कोणत्या कालावधीत ब्राझील मधील परदेशी पर्यटकांची संख्या कमी झाल्याचे आढळते ?
6. ६) २०१० नंतर भारतातील परदेशी पर्यटक मोठ्या प्रमाणावर वाढण्यामागचे कारण काय?

**प्रश्न ७. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (फक्त २)**

१) कृषी क्षेत्र भेटी दरम्यान शेतकऱ्याच्या मुलाखतीसाठी प्रश्नावली तयार करा.

२) भारतीय वन्य प्राण्यांचे संरक्षण व वनसंवर्धनासाठी उपाययोजना सांगा.

३) ब्राझील मधील 'अवर्षण चतुष्कोन' या विषयी माहिती लिहा.

************